बहुतांच्या कामास यावे ।
बहुतांच्या सुखी सुखावे ॥

महाराष्ट्र शासन
धाराशिव जिल्हा परिषद, धाराशिव
जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राज्य महामार्ग क्र.211,धाराशिव 413501
दूरध्वनी 02472-226840 ईमेल ceozpdharashiv@gmail.com, CEOZP.dharashiv@maharashtra.gov.in वेब https://www.zposmanabad.gov.in

जा.क्र.जिपधा.मुकाअ.स्वीय. 185 दिनांक 09.07.2024

संदर्भ :-1) दि.09.07.2024 रोजी जि.प.प्रा.शा.सांजा ता.धाराशिव येथे दिलेली भेट व आढावा.

**शालेय इमारत वर्गखोली बांधकामांना प्रशासकीय मान्यता देताना विद्युत जोडणी, प्रकाश, पंखे व्यवस्था इ. कामाचा समावेश करणेबाबत.**

**==================================**

## परिपत्रक

आज दि.09.07.2024 रोजी शाळा भेटी करण्यात आलेनुसार शालेय वर्गखोल्यांमध्ये पुरेशी प्रकाश व पंख्यांची व्यवस्था नसल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

2. शाळा वर्गखोली इमारत बांधकामामध्ये विद्युत जोडणी कामाचा समावेश नसून निधी उपलब्ध नसल्याचे नमूद करण्यात आले. सदर बाब प्रशासकीय दृष्टया योग्य नसून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अध्यापनामध्ये अडथळा निर्माण करणारी आहे.

3. सबब यापुढे शाळा इमारत वर्गखोली बांधकामांना प्रशासकीय मान्यता देताना वीज जोडणी, प्रकाश व पंख्यांची व्यवस्था इ. कामाचा समावेश असल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

शालेय इमारत बांधकामात वीज जोडणी, प्रकाश, पंख्यांची सोय नसल्याचे आढळून आल्यास शिक्षण व बांधकाम विभाग प्रमुख तसेच संबंधीत क्षेत्रीय अधिकारी-कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

वरीलप्रमाणे परिपत्रकाची नोंद संबंधीत खाते प्रमुखांनी घेवून यथोचित कार्यवाही अनुसरावी.

Mainak

**(डॉ.मैनाक घोष) भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
जिल्हा परिषद, धाराशिव

पत्रक पाठवले............
दिनांक 10/7/24
सही.........

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

1.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.धाराशिव.
2.शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.धाराशिव
3.कार्यकारी अभियंता (बांधकाम), जि.प.धाराशिव
4.गट विकास अधिकारी (सर्व), पंचायत समिती जि.धाराशिव
5.गटशिक्षणाधिकारी (सर्व), पंचायत समिती जि.धाराशिव
6.सर्व उपअभियंता, पंचायत समिती (सर्व) जि.धाराशिव

***